मराठी पहिल्या व दुसऱ्या पुस्तकांतील, कठिण शब्दार्थ, आणि कवितान्वयार्थ.

मराठी पहिली व दुसरी इयत्ता शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां,

जनार्दन महादेव गुर्जर

ह्यांनीं तयार केलें.

मुंबई

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

सन १८९१ इसवी.

आवृत्ति ३ री.

किंमत २ आणे.

भूगोलविषयींतील शब्दांच्या व्याख्या.



पृथ्वीचे भाग १०.—महाद्वीप. बेट. द्वीपकल्प. संयोगीभूमि. भूशिर. पर्वत. खोरें. मैदान. किनारा. बंदर. १. पृथ्वीवर जमिनीचा जो मोठा भाग तें **महाद्वीप.** २. चोहोंकडून पाण्यानें वेष्टित जी जमीन तें **बेट.** ३. तीन बाजूंनीं पाण्यानें वेष्टित जी जमीन तें **द्वीपकल्प.** ४. भूमीच्या दोन प्रदेशांस जोडणारी जी अरुंद जमीन ती **संयोगीभूमि.** ५. जें जमिनीचें टोंक समुद्रांत लांब गेलें असतें तें **भूशिर.** ६. जमिनीवर जे मोठे उंचवटे असतात ते **डोंगर.** तेच फार मोठे व लांब ते **पर्वत.** ७. पर्वत किंवा डोंगर यांच्या मधील खोल प्रदेश तें **खोरें.** ८. सपाट जमिनीचा जो मोठा प्रदेश तें **मैदान.** तेंच उंच असल्यास **पठार.** ९. समुद्राच्या कडेची जी जमीन तो **किनारा.** १० ज्या शहरीं जलमार्गानें व्यापार चालतो तें **बंदर.** **पाण्याचे भाग १०.**—महासागर. समुद्र. सामुद्रधुनी. अखात. उपसागर. खाडी. सरोवर. नदी. कालवा व संगम. १. पृथ्वीवर फार मोठा पसरलेला जो उदकाचा संचय तो **महासागर.** २. महासागराचा जो भाग तो **समुद्र.** (सागर) ३. दोन समुद्रांस जोडणारा जो पाण्याचा भाग ती **सामुद्रधुनी.** (संयोगीजल). ४. भूमीवर फार लांब गेलेला जो सागराचा फांटा तें **अखात.** ५. ज्या अखाताचें मुख रुंद असतें तो **उपसागर.** ६. नदीच्या मुखांतून समुद्राचें पाणी जेथपर्यंत वर जातें ती **खाडी.** ७. चोहोंकडून भूमीनें वेष्टित जो उदकाचा प्रदेश तें **सरोवर.** ८. पर्वत डोंगर किंवा सरोवर ह्यांपासून निघणारा जो उदकप्रवाह ती **नदी.** मोठे असतील ते **नद.** ९. सरोवराचा किंवा नदीचा फांटा फोडून जो लांब नेलेला असतो तो **कालवा.** १०. दोन

नद्या जेथें एकत्र होतात तो **संगम.** नदी जेथून निघते तो तिचा **उगम.** जेथें (समुद्रास) मिळते तें तिचें **मुख.** फार उंचावरून खालीं पडणारा जो पाण्याचा लोट तो **धबधबा.** समुद्राचें पाणी जेव्हां वाढतें ती **भरती.** तें जेव्हां कमी होतें ती **ओहोटी.**

दिशा.

पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर अशा मुख्य दिशा चार. ज्या दिशेस सूर्य उगवतो ती **पूर्व.** जिकडे सूर्य मावळतो ती **पश्चिम.** पूर्वेस तोंड करून उभें राहिलें असतां उजव्या बाजूची ती **दक्षिण.** व डाव्या बाजूची ती **उत्तर.** दक्षिण व पूर्व ह्यांच्या मध्यें **आग्नेयी.** दिशा. दक्षिण व पश्चिम ह्यांच्या मध्यें **नैर्ऋत्य** दिशा. उत्तर व पूर्व ह्यांच्या मध्यें **ईशानी** दिशा. उत्तर व पश्चिम ह्यांच्या मध्यें **वायव्य** दिशा. अशा चार उपदिशा. **नकाशा** पहातेवेळीं त्याची वरची बाजू ती उत्तर, खालची बाजू ती दक्षिण, उजवीकडची ती पूर्व, डावीकडची ती पश्चिम.

मराठी पहिल्या पुस्तकांतील कठिण शब्दार्थ आणि कवितान्वयार्थ.



कर—ह्मणजे—हात, हस्त.
घर—गृह, राहण्याची जागा.
मठ—आश्रम; संन्यासी, गोसावी इत्यादिकांचें घर.
रथ—सुंदर गाडी.
ईट—वीट.
ईद—मुसलमानांचा एक सण.
उर—हृदय, छाती.
ऊठ—उभा रहा.
गप—खोटी गोष्ट, थाप, वात.
खप—विक्री, श्रम कर.
पर—श्रेष्ठ, दुसरा, पंख, शत्रु.
रग—कळ, एट; मस्ती.
ऐक—श्रवण कर.
चल—निघ, चालू व्हाग.
कस—कसोटी, सत्व.
नख—नखर.
जग—सृष्टि, पृथ्वी.
मग—नंतर, कांहीं वेळानें.
तप—देवाच्या भेटीकरितां जें कर्म करणें तें, तपश्चर्या, बारा वर्षांचा काळ.
वड—वट, एकप्रकारचें झाड.
पड—ओसाड, वहिवाट नसलेलें स्थल.
पळ—धांव, ६० विपळें.
वळ—एकप्रकारचा रोग, फीर.
कट—तोटा, मिलाफ, एकी.
कड, कढ—पातळ पदार्थ शिजतांना येतात ते. [रे. भाताची उकळी वगैरे.
पट—वस्त्र, वादविणें, सोंकट्या, बुद्धिबळें वगैरे खेळण्याकरितां तयार करितात तो.
तट—नदीचें तीर, मोठी भिंत, पक्ष, कट.
नट—सोंग घेणारा, वेषधारी.
नथ—स्त्रियांच्या नाकांत घालण्याचा एक दागिना.
धर—पकड, पर्वत.
सर—एकीकडे हो, बरोबरी, योग्यता, तुलना, ज्या

दोऱ्यांत मोत्यें वगैरे ओंविलेलीं असतात तो.
मर—प्राण सोड.
वर—नवरा, श्रेष्ठ, आशीर्वाद.
मन—मानस. चित्त, ध्यान.
बन—दाट झाडी. वन, रान, अरण्य.
धन—पैका. वित्त. संपत्ति.
तन—तनु. काया. शरीर.
कण—भाग, परिमाणु.
सण—आनंदाचा दिवस.
मण—एकप्रकारचें वजन व माप.
रण—संग्राम. लढाई, युद्ध.
रड—रुदन कर. ओरड.
थट—नगार कर. समुदाय. झुबका. [बघ.
बघ—पहा. अवलोकन कर.
बक—एकप्रकारचा पक्षी, बगळा.
चट—नड. दगड फोडण्याच्या सुतळीला पोलादी तुकडा असतो तो.
भट—योद्धा. वीर.
रस—गोडी. ऊंस. आंबा वगैरेपासून निघतो तो.
ढग—पोकळ मेघ, अभ्र.
गड—दुर्ग, किल्ला.
जड—मंदबुद्धि, वजनदार.
घण—हातोडा. दाट.
बळ-अवमान. सामर्थ्य, सैन्य.
तळ—भांड्याचें वगैरे बूड. शेवट. फौजेची छावणी. मुक्काम. ता.
फळ—सिद्धि, झाडाला येतात
ढब—ऐट, चाल. शैली.
चव—मोत्याचें वजन. रुचि.
भय—भीति. धास्ती.
जय—यश. जिंकणें.
आग—अग्नि. विस्तव.
ओघ—कल, प्रवाह.
औत—शेतकीचें हत्यार.
आड—विहीर. मागें.
आळ—आरोप. कुभांड.
ओस—ओसाड. मसाण.
कपट—कृत्रिम. युक्ति.
तरट—गोणपट.
गवत—तृण. गुरांचें खाणें.
तबक-ताट. [चालणारा पक्षी.
बदक—एकप्रकारचा भूमीवर
मसक—लहान माशी. चिलट वगैरे.

टणक—कठ, दुखड.
नगर—पूर, पट्टण, शहर.
नजर—दृष्टि, देखरेख.
शहर—ज्या ठिकाणीं मोठा व्यापार चालतो तें.
शरम—लज्जा, लाज, अब्रू.
दगड—पाषाण, शिला, मूर्ख.
जखम—घाय, क्षत, खोंक.
फणस—पनस, एकप्रकारचें मोठें फळझाड. [माव.
कळप—टोळी, समुदाय, ज-
रकम—जिन्नस, संख्या.
कलम—लेखणी, कापणें, झाडाचें कलम.
ओळख—परिचय. [दवा.
औषध—औषध, ओखद,
धनगर—मेंढ्या व गुरें राखून निर्वाह करणारा. [चल.
गडबड—घाई, धांदल, गल-
चळकट—दांडगा, मजबूत.
लवकर—त्वरित, सत्वर, जलद.
गाय—गौ, धेनु.
पाटी—टापली, लिहिण्याकरितां लांकडाची किंवा दगडाची केलेली तीं.
शेळी—अजा, बकरी.
टोपी—डोकीचें हलकें आच्छादन.
पोथी—ग्रंथ.
घोडा—हरि, अश्व.
गोटा—वाटोळा दगड, नारळांतील मोक.
रेडा—हेला, टोणगा.
चाक—चक्र. [ति.चवथा अंक.
चार—चेष्टा, ओलें कोंवळें गव-
मामा—मातुल, आईचा भाऊ.
गाळ—कचरा, गदळ, केर.
घाम—धर्म, स्वेद.
ताप—ज्वर, उष्णता.
गाडी—रथ.
हात—हस्त, कर, पाणी.
पाय—पद, पाद, चरण.
बोट—अंगुली, आंगुळ.
नाक—नासिक, घ्राण.
आजा—बाप अथवा आई यांचा बाप.
आजी—आजाची बायको.
मामी—मामाची बायको.
चोर—नकळत वस्तु नेणारा.
पोर—मूल, मुलगा.
थोर—मोठा, श्रेष्ठ, बर.

मोर—मयूर, एकप्रकारचा पक्षी.
वाडा—इमारत. मोठें घर. बंगला.
किडा—कीटक.
पीडा—त्रास. यातना, दुःख.
डोळा—नेत्र, नयन. चक्षु.
विळा—कोयता.
पोट—उदर. जठर.
पाठ—पृष्ठभाग, धडा.
गाल—गल्ल.
गळा—गल, कंठ.
जीभ—जिव्हा, रसना.
मान—मोठेपणा, गर्व, गळ्याच्या मागचा भाग.
डोकें—मस्तक.
पाणी—उदक, हात. [पाती.
पोळी—गव्हांची भाकर. च-
भात—तांदूळ शिजवून करितात तो.
लोणी—नवनीत.
लाडू—एकप्रकारचें पक्वान्न.
तूप—लोणी कढवून करितात तें.
दूध—पय, दुग्ध. [तें.
ताक—तक्र. दह्याचें करितात.

भाजी—शाखा, शाक.
पाला—झाडाचीं पानें.
मेवा—मिठाई, माखरेचे पदार्थ. उत्तम फळें.
झाड—वृक्ष, तरु, द्रुम, साफक.
फूल—सुमन, पुष्प, सुम.
साल—त्वचा. वर्ण.
मूळ—पाळ. प्रथम बोलावणें.
पान—पृष्ठ.
डाळी—शाखा. फांदी, खांदी.
शिडी—लहान दादर. निसण.
दोरी—रज्जु. रशी.
मौज—मजा, गमत.
फौज—सेना, लष्कर, सैन्य, दळ, बळ. कटक.
खेळ—क्रीडा.
पेटी—संदुक.
रेती—वाळू.
भाऊ—बंधु. बांधव, सहोदर.
अळू—एकप्रकारचें फळ व भाजी.
दार—द्वार, दरवाजा, कवाड, झडप.
मीठ—लवण, समुद्राचें पाणी सुकवून करितात तें.

हिरवा—एकप्रकारचा कच्चा
रंग. [रंग.
पिवळा—पीत, हळदीसारखा
पिकला—अलगला, पक्क
आला.
बहीण—स्वसा, भगिनी.
चुलता—काका, पितृव्य, बा-
पाचा भाऊ. [बायको.
चुलती—काकी, चुलत्याची
मावशी—आईची बहीण.
मेहुणा—बहिणीचा नवरा अ-
थवा बायकोचा भाऊ.
बोकड—बकरा.
गाढव—गर्दभ, खर.
कावळा—काक, वायस.
पारवा—एकप्रकारचा पक्षी.
गिधाड—गृध्र. [हीन पक्षी.
चिमणी—एकप्रकारचा ल-
वाईट—खराब, चांगला नव्हे
ता. [हीन.
गरीब—दरिद्री, दीन, द्रव्य-
मालुम—संभावित, सभ्य,
चांगला.
लबाड—लुच्चा, हुशार, खोटा.
शेजार—जवळची वस्ती.
तुकडा—भाग, हिस्सा.

मुलगा—पुत्र, सुत, लेक.
मुलगी—सुता, कन्या, वधू.
विहीर—आड, कूप.
ओसरी—ओटी, पडवी.
खिडकी—बारी.
कवाड—ताटी, द्वार, दरवाजा.
उखळ—उखळी, वाईन.
मोती—मौक्तिक, मुक्त.
जांब—काजूच्या झाडाचें फळ.
तोंड—वदन, आनन, मुख.
दांत—दंत, द्विज.
ओंठ—ओष्ठ.
दही—दधि. [डेंख.
देंठ—फूल व फळ याचें मूळ,
आंबा—आम्रवृक्ष, आम्रफल.
खांब—स्तंभ, आधारभूत
लांकूड.
लांब—दूर. [वेष.
सोंग—गमतीकरितां घेतलेला
ढोंग—कपट.
कोंब—मोड, अंकुर.
तांबडा—आरक्त, लाल.
पांढरा—श्वेत, सफेत, शुभ्र.
सांवळा—काळसर, श्याम,
निळा.
कोंवळा—कोमल, नाजुक.

चांगला—उत्तम, बरा.
जोंधळा—ज्वारी, यावानल.
गोंधळ-धावडधिंगा, घोटाळी.
पांगळा—पंगु, पाय नाहींत तो.
कोंचट—थोडें तापविलेलें.
जांभळा—एकप्रकारचा रंग.
पाखरूं—लहान पक्षी.
वासरूं—गाईचें वत्स.
कोंकरूं—मेंढराचें पोर.
कृपा—ममता, माया, दया.
गृह—घर, सदन, अगार.
तृषा—तहान, शोष.
दृष्टि—नजर.
नृप—राजा, भूपाल, भूपति.
पृष्ठ—पत्र, पाठ.
वृष्टि—पर्जन्य, वर्षाव.
बृहत्—मोठा, अफाट.
मृत—मयत, मेलेला.
सृष्टि—विश्व, जग.
हृदय—अंतःकरण, काळीज.
अंग—काया, तनु, शरीर.
सुंदर—उत्तम, चांगलें, सुरेख.
उंट—उष्ट्र, एक जनावर. [नी.
सुंठ—आलें सुकवून करितात
पिंगळा—एकप्रकारचा पक्षी.
इंगळा—निखारा.

प्रातःकाल—प्रभातकाल, स-
काळ.
इतःपर—आजपासून, याउ-
पर, यापुढें.
कःपदार्थ-काय पदार्थ! [पण.
अक्कल-हुशारी, बुद्धि, शहाण-
शक्त—समर्थ.
वाक्य—शब्दांची जुळणी.
चक्र—चाक.
पक्क—पिकलेलें, तयार.
सख्य—स्नेह, दोस्ती, मैत्री.
नग्न—नागवा, वस्त्ररहित.
योग्य—उचित, लायक.
उग्र—भयंकर.
ग्लानि—तलखली, दाह.
विघ्न—संकट, अडथळा.
उच्च—उंच.
स्वच्छ—चांगलें, निर्मळ.
मज्जा—मगज, गीर, मेंदु.
राज्य—राष्ट्र, अधिकार.
हट्ट—दुराग्रह, हेका.
जाड्य—जडपणा, मंदबुद्धि.
अरण्य—रान, वन, जंगल.
पित्त—शरीरांतील तीन दोषां-
पैकीं एक. [त्यादि.
रत्न—मोतीं, हिरा, पाच इ-

तत्पर—तल्लीन.
आत्मा—जीव, प्राण.
सात्म्य सजीवत्व.
सत्य—खरें.
चित्र—तसबीर.
शुद्ध स्वच्छ, निर्मळ, पवित्र.
उद्भव जन्म, उत्पत्ति.
पद्म—अंबुज, कमळ.
विद्या—विद्वत्ता, ज्ञान.
निद्रा नीज, झोप, स्वप्न, डावा.
द्वेष—वांकडेपणा, वैर, वैमन-
अन्न—खाण्याचे पदार्थ, खाद्य.
अन्य—निराळा, इतर, दुसरा.
पुन्हा पुनरपि, फिरून.
तप्त—तापलेलें.
स्वप्न—प्राण्याच्या चार अव-
स्थांपैकीं एक अवस्था.
प्याला—आंब, प्राशन केलें.
प्रथम—आरंभ, पहिलें.
शब्द—आवाज, ध्वनि.
ब्राह्मण—विप्र, भूदेव.
शुभ्र—पांढरा, सफेत.
सभ्य—कुलीन, संभावित.
ग्राम्य गांवढळ, गांवासंबंधीं.
नम्र—लीन, गरीब. [लेला
म्लान—सुकलेला, कोमेज-
तर्क—कल्पना, विचार, अट-
कळ.
स्वर्ग देवलोक.
सर्प—साप, नाग, चक्षुःश्रवा.
आर्य श्रेष्ठ, मोठा.
सुऱ्या-एकाप्रकारचीं हत्यारें.
अल्प—स्वल्प, थोडें, किंचित्.
जिल्हा—इलाख्याचा भाग.
व्यय—खर्च, जाणें.
तीव्र—कठिण, तीक्ष्ण, उग्र.
प्रश्न—विचारणें, पुसणें.
तेव्हां—त्या कालीं, त्या वेळीं
अवश्य जरूर, अगत्य, फार
गरज.
आश्रय आसरा, आधार.
श्लोक कवितेचा अथवा प-
द्यरचनेचा एक प्रकार.
निश्चय—संकेत, ठराव, बेत.
पुष्कळ—बहुत, अतिशय,
फार. [वाईट.
नष्ट—नाहींसें झालेलें, दुष्ट,
उष्ण—कढत, गरम, ऊन.
पुष्प—फूल, सुमन, सुम.
उष्मा—गरमी, उकाडा, उ-
न्हाळा.
तस्कर—चोर.

सुस्त—थंड, मंद, आळशी.
स्वस्थ—शांत, स्थिर, साव-
काश.
स्नान—आंघोळ, मज्जन.
स्पष्ट—खुलें, उघडें, साफ.
भस्म—रक्षा, राख.
स्राव गळणें, पाझरणें.
शस्त्र—हत्यार
ह्रस्व—लघु, आंखूड.
तीक्ष्ण—कठीण, तिखट.
लक्ष्मी—संपत्ति, विष्णूची स्त्री.
लक्ष्य—मन, चित्त, ध्यान.

धडा १ ला.

धडा—पाठ, दहा शेरांचें व-
जन.
बाप—जनक, पिता, तात.
आई—जननी, अंबा, माता.
मूल—वत्स, लेंकरूं, पोर.
केळें—एकप्रकारचें फळ.
कुत्रा—श्वान, पिशुन, ग्रामसिंह.
लेखणी—लेखनिका, कलम.

धडा २ रा.

भेटली—गांठ पडली.
परकर—घागरा.
अंगरखा—अंगांत घालण्याचें
वस्त्र, अंगत्राण.
द्वाड—हट्टी, वाईट, खोडकर.
उगाच—कारणावांचून, रि-
कामा.
भोंकतो—ओरडतो, भुंकतो.
हट्टी—हेकेखोर, द्वाड.
तोंड—मुख, आनन, वदन.
स्वच्छ—निर्मळ.
भिजलें—ओलें झालें, आर्द्र झालें.
लहान—लघु.
वाडा—बंगला, मोठी हवेली.
मोठा—थोर, श्रेष्ठ.

धडा ३ रा.

चांगलें—सुंदर, सुरेख, नामी.
गोड—मधुर.
झाड—वृक्ष, द्रुम, नग.
उंच—उच्च, वर गेलेला.
रडकें—रडणारें, रडवें.
चांगला—बरा, पुष्कळ, फार.
पाऊस—पर्जन्य, उदकवृष्टि.
पीक—उत्पन्न.

धडा ४ था.

थोडें—कमी.
हात—कर, पाणि.
लांब—आखूड नव्हे तो, दूर.
खांदी—डहाळी, फांदी.
फार—अतिशय, पुष्कळ.

बारीक—लहान, सूक्ष्म.
भिंत—भित्त, तट, चुना, विटा अगर माती, दगड यांची करितात ती.
वाटोळें—वर्तुळ, गोल.
रुंद—पसरट.
ठेंगणी—नीच, आंखूड.
पिकला—पक्क झाला, तयार झाला. [लेला.
भुकेला—क्षुधित, भूक लाग-
दिसतो—दृष्टीस पडतो, वाटतो.
ऊस—इक्षुदंड, ज्याच्या रसापासून गुळ, साखर वगैरे होतें तो.
कांडी—तुकडा.
पुष्कळ—विपुल.

धडा ८ वा.

सकाळीं—प्रातःकाळीं.
फुलें—पुष्पें.
आणितें—घेऊन येतें.
बाग—आराम, बगीचा.
दिसतात—नजरेस पडतात.
शेत—क्षेत्र, मळा, धान्य उत्पन्न करितात ती जमीन.
बाजरी—एकप्रकारचें धान्य.
पिकतें—उत्पन्न होतें.
धुवायास—साफ करावयास.
मातीचें मृत्तिकेचें, चिखलाचें.
चित्र—तसबीर.
वारा—वायु, पवन, वात.
पाऊस—पर्जन्य.
दूध—दुग्ध.
दिवस—सूर्य, दिन.
वर आला—उंच आला.
पहा—बघा, अवलोकन करा.
चांद—चंद्र, शशि, सुधाकर.
उगवला—उदयास आला.
विहीर—आड, बाव.
खारें—खारट.
तळें—सरोवर, कासार, तडाग.

धडा ९ वा.

इकडे—येथें.
पाट—लांकडाचा बसावयाकरितां करितात तो.
लोटी—एकप्रकारचें भांडें.
कोठें—कोणत्या ठिकाणीं.
पाणी—उदक, जल, नीर.
आई—माता, जननी. [र्थ.
खाऊ—खाण्याचा गोड पदा-
भूक—क्षुधा.
काका—चुलता.

टोपली—पांटी.
अंजीर—खाण्याचें फल असून तें उंबराच्या फलासारखें असतें. [णारा.
बुरुड—टोपल्या वगैरे विण-
चौरंग—चार पायांची लांकडाची वगैरे बैठक.
खूर—पाय. [ला.
नीट—दुरुस्त, बरोबर, चांग-
काम—उद्योग, धंदा, काज.
सुतार-लांकुडकाम करणारा.
शिवाय—वांचून, खेरीज.
चुका—लहान खिळे.
बसवील—जडवील. [रितां.
खेळायास—मौज करण्याक-
खेळणीं—खेळण्याच्या वस्तु.

धडा ७ वा.

बोरें—एकप्रकारचीं लहान खाण्याचीं फलें.
पाहिलीं—बघितलीं, देखिलीं, अवलोकिलीं.
ह्मणाला—बोलला.
भांडें—भाजन.
परंतु—पण.
लहान—अरुंद, बारीक.
निघेना—येईना, सुटेना.
जवळ-नजीक, समीप, सन्निध.
एकदम—एकाच वेळीं. [तीं.
थोडीं—कमी, पुष्कळ नव्हत
इतकीं पुरत—हीं बस आहेत.
पदार्थ—वस्तु, जिन्नस.
घ्यावयास पाहतो—घेण्यास इच्छितो.
मुळींच—अगदींच.
मिळत नाहीं—लाभत नाहीं, प्राप्त होत नाहीं.
थोडा—कमी.
सहज-अनायासें, श्रमावांचून.
मिळतो—प्राप्त होतो, लाभतो.

धडा ८ वा.

बेडूक—मंडूक, एकजातीचा पाण्यांत व जमिनीवर रहाणारा प्राणी. [चलेली.
कल्पित—कल्पनेनें, तर्कानें र-
कांहीं—कित्येक.
कांठीं—कडेवर, तीरीं.
मौजेनें—हांशीनें, गमतीनें.
दगड—धोंडा, पाषाण.
फेकूं लागले—टाकूं लागले.
लागले—त्यांच्या आंगावर पडले, बसले.
दुःख—इजा, त्रास.

जीव—प्राण.
शाहाणा—सुज्ञ, विचारी.
गड्यांनो—सोबत्यांनो. मित्रांनो.
खरें सत्य.
काम—कार्य, उद्योग.
उपद्रव—इजा, दुःख, त्रास.
पूर्वी—अगोदर, पहिल्यानें.
विचार—मनन.

धडा ९ वा.

भावंडें—बहीणभाऊ.
मोठा—थोर, वडील, श्रेष्ठ.
आळशी—सुस्त, मंद, थंड.
शाळा—विद्या शिकण्याची जागा. [ळीं.
वेळच्या वेळेस—नेमलेल्या वे-
पंतोजी—गुरु, शिक्षक.
विचारिलें-पुशिलें,प्रश्न केला.
काल-गेल्या दिवशीं.
ताप—ज्वर.
संध्याकाळीं—सायंकाळीं.
लबाड-खोटें बोलणारा, लुच्चा.
आवडत नाहीं—पसंत नाहीं.
वाईट वाटलें—दुःख आलें.
आजपासून—ह्या वेळेपासून. यापुढें.
कधीं—केव्हांही.
खोटें—असत्य, मिथ्या.
बोलणार नाहीं—सांगणार नाहीं. [टप्पु.
उनाड-भटकणारीं, उडाण-
निमित्त-मिष, कारण, सबब.
राग—क्रोध, रोष.

धडा १० वा.

वेडा—मूर्ख, बुद्धिहीन.
पोथी-विद्येचें पुस्तक.
जपून—व्यवस्थित, काळजीनें
मळवितो—खराब करितो.
शाहाणा—चांगला,बुद्धिमान
फाडीत—तुकडे करीत.
शाई—कागदावर लिहिण्याकरितां केलेला पातळ पदार्थ.
पाडीत नाहीं मोडीत नाहीं.
टवाळकी—चिटवळपणा, अमर्यादपणा.
भांडत—कज्जा करीत.
खोड्या—टवाळ्या, कळी.
सर्व—सगळें, सकल. [स्नेह.
प्रीति—दया, माया, ममता,
ह्मणून—यासाठीं, याकरितां.

धडा ११ वा.

चांगला—शहाणा, उत्तम.
लवकर—त्वरित, जलद.
रडतो—रुदन करितो.
आज्ञेंत—हुकुमांत, धाकांत.
धडा—पाठ करण्याकरितां नेमून दिलेला अभ्यास. [पाठ.
खरें—सत्य.
शेजारी—जवळ राहणारे.
शिव्या—अपशब्द, गाळी.
वस्त—पदार्थ, जिन्नस.
चोरून—नकळत, लपवून.
काम—कार्य, उद्योग.

धडा १२ वा.

धाकटी—लहान, अनुजा.
शहाणी—सुज्ञ, समजुनदार.
नित्य—प्रत्यहीं, रोज, नेहमीं.
शाळेंत—विद्यालयांत.
चांगला—उत्तम.
शिके—तयार करी, पाठ करी.
शाबासकी—बक्षीस, मोठेपणा.
दांडगाई—मस्ती. [डतांच.
लागलेंच—त्याच वेळीं, ताव-
भावानें—बंधूनें.
बाहुली—लांकडाचें अथवा मातीचें चित्र.
बोलणें—संभाषण.
शाबास—धन्य, वाहवा.
द्वाड—वाईट, खोडकर, दुष्ट.
दुसऱ्याची—पराची, अन्याची, परक्याची.
एकादी—कोणतीही.
नकळतां—न समजूं देतां.
वाईट वाटतें—दुःख होतें.

धडा १३ वा.

कुलुंगें—कुत्र्याची एक लहान जात.
जात—भेद, प्रकार.
रंग—वर्ण.
पांढरा—सफेत.
बांडा—पांढरा आणि काळा.
स्वभावानें—वृत्तीनें.
गरीब—नम्र, साळस. [दार.
सुरेख—नामी, सुंदर, शान-
हांशी—शोकी, गमती, चैनी.
मौजेनें—आनंदानें, गमतीनें.
बाळगितात—पाळतात. [मे.
धन्याबरोबर—मालकामागे-
संतोष—आनंद, हर्ष, तोष. [म.
फिरावयास—सहल करावया-
लाडक्या—प्रीतीच्या, आवडत्या.

लाड—लडिवाळ, प्रीतीची वागणूक.
वागतें—वर्तन करितें.

धडा १४ वा.

शाहाणपण—बुद्धि, चातुर्य.
उपयोगी—उपयुक्त, कामाचे.
मारितें—प्राण घेतें.
उन्दीर—मूषक, आखु.
दाणे—धान्य.
चिरगुटें—वस्त्रेंपात्रें.
उपद्रव—त्रास, इजा, दुःख.
बंदोबस्त—व्यवस्था.
गोष्ट—कथा.
गृहस्थ—कुलीन मनुष्य.
चाल-रीत, वहिवाट, शिरस्ता.
जवणाची—भोजनाची.
वेळ—समय.
घांट—घंटा. [माव.
मंडळी—मेळा, मनुष्यांचा जमाव—एकत्र होन.
खोली—कोठडी.
टांगून—लोंबून, ओळकंबून.
भलत्याच वेळीं—अकालीं.
माणसें—मनुष्यें.
हुशीस—नजरेस.

धडा १५ वा.

कोळसा—विझालेला निखारा.
काजळ—कज्जल, मस.
चुना—चुनखडे भाजून करितात तो.
खडू—पांढरी माती, चाक.
कापूस—कार्पास, रू. [धातु.
रुपें—रौप्य, मौल्यवान् पांढरा
हळद—हरिद्रा, हळखुंडाची पूड.
कुंकू—कुंकुम, पिंजरेंत तेल वगैरे घालून करितात तें.
रक्त—प्राण्याच्या शरीरांतील तांबडा रसरूपी सत्व.
शेंदूर—एकप्रकारचा भगवा रंग.
अळिता—लाखेचा लाल रंग.
कुसुंबा—एकप्रकारचा तांबडा रंग.
तांबें—तांब्रम धातु.
पान—पर्ण, पत्र.
पोपट—राघु, शुक, कीर.
पाच—एकप्रकारचें रत्न, एक सुवासिक वनस्पति.
गुळी—नीळ.
आकाश—पोकळी, आभाळ.

ओळखतो–जाणतो.

धडा १६ वा.

झोप–निद्रा, नीज.
अंथरूण–बिछाना.
माजघर–मध्यगृह, घरांतील मधली जागा.
पांघरूण–आंगावर घेण्याचें वस्त्र.
पासोडी–जाड सुताचें एक वस्त्र.
पांघरून आंगावर घेऊन.
मकलाद–बनात, लोकरीचें वस्त्र.
जड–वजनदार.
रजई–रू भरलेलें पांघरण्याचें वस्त्र.
अंगवस्त्र–अंगावरचें धोतर.
उगाच–रिकामा.
कटकट–किरकीर.

धडा १७ वा.

सरकारी राजानें घेतलेल्या.
शिकत–अभ्यास करीत.
धुळाक्षर–उजळणी.
महिना–मास, तीस दिवस.
अजून–अद्यापि.
वरकड–दुसरें, इतर, बाकीचें.
मात्र–फक्त, केवळ.
सारें–सर्व.
संपावयास–पूर्ण व्हावयास.
आठवडा–सात दिवस.
वर्ग–भाग, पक्ष.
बराच–पुष्कळ, फार.
झटून–मन लावून, आस्थेनें.
शीक–अभ्यास कर.
बरें–चांगला.

धडा १८ वा.

सोबती–संगति, मित्र, गडी.
हाका–साद.
उशीर–वेळ.
पंतोजी–गुरु, शिक्षक.
वाटतें–अनुमान होतें.
मारील देखील–शिक्षाही करील.
पाठ–तयार, मुखोद्गत.
मागें–पाठी, पश्चात्.
लाज–लज्जा, शरम.
चुकवीत–टाळीत.
शाबासकी–मोठपणा, वाहवा.
मिळवितात–संपादितात.
हांसतात–मूर्ख ह्मणतात.
आवडत नाहीं–प्रिय नाहीं.

धडा १९ वा.

जवळ–पाशीं, सन्निध.
तिकडे–तेथें.
एव्हां–ह्या वेळीं, आतां.

गाईला—धेनूला.
पाणी—जल,नीर,तोय,उदक.
आंबोण—धान्य, कोंडा वगैरे एके ठिकाणी शिजवितात तें.
चार—खावयास घाल.
वासरूं—वत्स.
धार काढ—दूध काढ.
लाथ मारील—पाय झाडील.
अगोदर—प्रथम, पहिल्यानें.
भाला दूध काढतांना लाथ बसूं नये ह्मणून पाय बांधितात तो, ओढी.
मड—आंचूल, थान.
राखून-दूध काढल्याशिवाय.
पोटमार—उपाममार. [पाल
गोवारी—गाई राखणारा, गो-
न्यावयास—घेऊन जाण्यास.
रानांत—जंगलांत, कुरणांत.
गोठा-गुरें बांधण्याची जागा.
झाडून—लोटून, केर काढून.
साफ—स्वच्छ, निर्मळ.
तापत—कढत.
जाळ—ज्वाला, विस्तव.
मंद-कमी, थोडा. [हिर सांडेल.
उतासजाईल-कढ येऊन बा-

साय—मलई, तापलेल्या दुधावर येते ती. [भांडें.
दुधाणें—दूध तापविण्याचें
चूल—स्वयंपाक करण्याची भट्टी.
खालीं उतर—जमिनीवर ठेव.
निवत—थंड होत.
विरजण—दहीं होण्याकरितां दुधांत जें ताक घालणें तें.

धडा २० वा.

भरून—तोंडापर्यंत पाणी घालून. [तु.
पितळ—कृतीची पिवळट धा-
सोन्याची-सुवर्णाची. [वरून.
कशावरून-कोणत्या कारणा-
अधिक—ज्यास्त.
डाग—कलंक, चट्टा, लांछन.
भांडें—पात्र, भाजन.
नुकतीच-इतक्यांत, आतांच.
घांसून—उजळून.
उद्यां—उदयिक.

धडा २१ वा.

पडछाया—प्रतिछाया, प्रतिबिंब.
उतरून—ओलांडून.
पलीकडे—पैलतीरीं.

तोंड उघडून—आ करून.
लोभानें—आशेनें.
तों—लगेच.
धरावयास—पकडावयास.
नळीं—नळाशीं, बुडाशीं.
पुन्हा—फिरून.
सांपडली—मिळाली.
तात्पर्य—सारांश, हांशील.
देवानें—ईशानें.
संतोष—आनंद.
जवळ—आपल्यापाशीं.

धडा २२ वा.

धनगर—गुरें, मेंढरें राखून पोट भरणारा.
पोर—मुलगा.
लांडगा—एक हिंसक पशु.
थट्टेनें—मस्करीनें, विनोदानें.
वेळोवेळीं—वारंवार.
ओरडत—हांका मारीत.
कुळंबी—शेतकरी.
फसले—ठकले.
समजलें—उमजलें.
लबाड—लुच्चा, थट्टेखोर.
मनास आणूं नये—ऐकूं नये, खरी मानूं नये.
घाबरून—भिऊन.
सावकाश—स्वस्थपणानें.
खाल्लीं—भक्षिलीं.
मनुष्य—मानव.
समजला—कळला, अवगत झाला.
विश्वास—भरंवसा, खात्री.
संकटांत—विपत्तींत, दुःखांत.
गोष्ट—वर्तमान, हकीकत, [कथा.
खोटी—लटकी, असत्य, मिथ्या.
कुमक—मदत, सहाय्य.

धडा २३ वा.

वानर—कपि.
राहतात—वस्ती करितात.
झाडांवर—वृक्षांवर.
उड्या—उड्डाण.
गांवांत—ग्रामांत, खेड्यांत.
खाण्याचा—भक्षण करण्याचा.
उचलून नेतात—घेऊन जातात.
खोडी—चेष्टा, टवाळी.
पदार्थ—जिन्नस, वस्तु.
चेष्टा—चार, थट्टा, वांकुल्या.
तंटे—कज्जे, भांडणें.
ओरबडणें—ओरखाडणें.
वेडावणें—वेड्यासारखी कृति करून दाखविणें.
मेहनत—श्रम, कष्ट.
गरिबीनें—लीनतेनें, नम्रपणानें.

उपयोगीं—कामीं.

कवितांतील शब्दार्थ

प्रार्थना—विनंति.
बाळ—अज्ञान मुलें, बाळकें.
सांभाळ—रक्षण, पोषण, पालन.
कीजे—करावें.
सर्वकाल—नेहमीं, चिरकाल, सदोदित, निरंतर.
दीनबंधु—गरिबांचा—रक्षण करणारा, भाऊ.
बलहीन—अशक्त.
ज्ञान-शहाणपण, बुद्धि, अक्कल.
रक्षावें—संभाळावें, पालन करावें.
वाढवावें—लहानाचें मोठें करावें.
कृपावंत—दयावंत, ममताळू.
ममता—माया, प्रीति.
अपार—अतिशय, अमर्याद.
निरंतर—नेहमीं, सदोदित.
थोर—पुष्कळ, अतिशय, मनस्वी.
उपकार—आभार.
वदत—बोलत.
विनोदें—थट्टेनें.
हांसत—हंसत हंसत.
मोडी—घाली.
नीज—झोंप, निद्रा.
न आली—न लागली.
गीत—गाणें.
प्रेम—प्रीति, प्रेमा.
अनिवार—अनावर, न आटोपणारें.
दुखणें—इजा, आजार.
उपचार-ओषधी-उपाय, खाण्यापिण्याची व्यवस्था.
कडेवर—कटीवर, कमरेवर.
फिरवी—हिंडवी.
चित्तीं—अंतःकरणांत, मनांत.
लोभ—हेतु, ममता, माया.
बाळक—तान्हें मूल.
दुर्बल—अशक्त, बलहीन.
रक्षण—सांभाळ, पोषण.
फार-अतिशय, पुष्कळ.
शिकविलें—पढविलें, सांगितलें.
वाढविलें—मोठें केलें.
भार-उपकार, आभार, ओझें.
स्मरण—आठवण.
दृढ—घट्ट.
वारंवार—पुनः, पुन्हा.
नित्य—नेहमीं, सदोदित.
साह्य—मदत.
अधिकार—कर्तव्य.
बळें—सामर्थ्यानें, शक्तीनें, जोरानें.

सखा—मित्र.
कृपावंत—कृपाळू, दयाळू.
वाचा—वाणी.
साळुंखी—एक जातीचा पक्षी.
मंजुळ—मधुर. गोड.
धणी—यजमान, मालक.
वेगळाची—निराळाच.
पामरें—दीनानें, गरिबानें.
उत्तरें—भाषणें, जबाब.
परि—परंतु, पण. णारा.
विश्वंभर—जगाचें पोषण कर-
तुका—एक मोठा साधु.
कळा—कल्पना. शक्ति. युक्ति.
वागवी—चालवी.
पांगुळा—पाय नाहींत असा.
वीण—शिवाय, रहित. असे.
मुके—बोलतां येत नाहींत
आंधळे—डोळे नाहींत असे.

पांगळे—पाय नाहींत असे.
थोटे—हात नाहींत असे.
साह्य—मदत.
मोटें—पुष्कळ.
हांसाल—थट्टा कराल.
तोटे—नुकसान.
प्रातःकाळीं—सकाळीं.
थंडगार—गारगार.
वारा—वायु. पवन. वात.
झुळझुळ—मंदमंद. हळूहळू.
येतो—वाहतो.
हुशार—सावध, आनंदित. [ता.
सुखशांति—आनंद व स्वस्थ-
जीव—सर्व प्राणी.
वनस्पति—झाडेंझुडपें.
आधार—आश्रय.
सुखदाता—आनंद देणारा.
उपकार—आभार.

कविता.

देवाची प्रार्थना.

अभंग.

देवा आम्ही बाळ । आमचा सांभाळ ॥
कीजे सर्वकाळ । दीनबंधु ॥ १ ॥

अन्वय—दीनबंधू देवा, आम्ही बाळ; सर्वकाळ आमचा सांभाळ कीजे.

अर्थ—हे गरिबावर ममता करणाऱ्या देवा, [आह्मा सर्वांस उत्पन्न करणारा तूं आहेस ह्मणून] आह्मी [तुझीं] लहान मुलें आहोंत; तूं निरंतर आमचें रक्षण करावें.

आह्मी बलहीन । नाहीं आह्मां ज्ञान ॥
आमचें पालन । कीजे देवा ॥ २ ॥

अन्वय—देवा, आह्मी बलहीन आहों. आह्मां ज्ञान नाहीं, आमचें पालन कीजे.

अर्थ—देवा, [सर्वांस ज्ञान व शक्ति देणारा तूंच आहेस, ह्मणून तुझ्याहून] आह्मी शक्तिहीन आहों. तसेंच आह्मांस शहाणपण नाहीं [ह्मणून] आमचें रक्षण [तूंच] करावें.

आह्मांसी रक्षावें । आणि वाढवावें ॥
बुद्धिज्ञान द्यावें । कृपावंता ॥ ३ ॥

अन्वय—कृपावंता, आह्मांसी रक्षावें आणि वाढवावें, बुद्धिज्ञान द्यावें.

अर्थ—हे कृपाळू देवा, आह्मास संकटाचे वेळीं रक्षावें. मोठें करावें आणि अक्कल व शहाणपण हेंही द्यावें.

आह्मा बाळांवर । ममता अपार ॥
देवा निरंतर । असों द्यावी ॥ ४ ॥

अन्वय—देवा, आह्मा बाळांवर निरंतर अपार ममता असों द्यावी.

अर्थ—देवा, आह्मा मुलांवर तुझी नेहमीं अतिशय दया असावी.

आईचे उपकार.

पद.

[आपल्यावर आपल्या आईचे किती व कसे उपकार आहेत हें ह्या पदांत सांगितलें आहे.

थोर तुझे उपकार । आई थोर तुझे उपकार ॥ ध्रु० ॥

अन्वय—आई, तुझे उपकार थोर ! तुझे उपकार थोर !

अर्थ—आई, तुझे आभार मुलांवर फार फार झाले आहेत.

वदन विनोदें हांसत सोडी । कोण दुधाची धार ॥ १ ॥

अन्वय—विनोदें वदत, हांसत दुधाची धार कोण सोडी ?

अर्थ—आई, गमतीनें पुष्कळप्रकारें बोलून हांसत हांसत माझ्या तोंडांत दुधाची धार कोण बरें सोडीत असे ! [तूंच. ह्मणून तुझे उपकार मोठे आहेत.]

नीज न आली तर गीत ह्मणे । प्रेम जिचें अनिवार ॥ २ ॥

अन्वय—नीज न आली तर गीत ह्मणे, जिचें प्रेम अनिवार.

अर्थ—मला झोंप लागली नाहीं ह्मणजे—पाळण्यांत घालून गोड गोड शब्दांनीं—गाणें ह्मणावें अशी जिची मजवर अतिशय ममता [अशी ती तूंच. ह्मणून तुझे उपकार मोठे आहेत.]

येई दुखणें तेव्हां मजला । कोण करी उपचार ॥ ३ ॥

अन्वय—मजला दुखणें येई, तेव्हां उपचार कोण करी

अर्थ—जेव्हां मी अजारी पडत असें तेव्हां मला औषधपाणी कोण देत असे? [तूंच, ह्मणून तुझे उपकार मोठे.]

कोण कडेवर घेउनि फिरवी । चित्तीं लोभ अपार ॥ ४ ॥

अन्वय—कडेवर घेउनि कोण फिरवी? चित्तीं अपार लोभ.

अर्थ—मला कडेवर घेऊन कोण बरें हिंडवीत असे? जिच्या मनांत मजविषयीं अतिशय प्रेम असावें! [अशी तूंच ह्मणून तुझे उपकार मोठे.]

बालक दुर्बल होतों तेव्हां । रक्षण केलें फार ॥ ५ ॥

अन्वय—दुर्बल बालक होतों तेव्हां फार रक्षण केलें.

अर्थ—जेव्हां मी अगदीं निर्बल [व] कोमल मूल होतों तेव्हां तूं फारच-चांगल्या प्रकारें रक्षण केलेंस [ह्मणून तुझे उपकार फारच मोठे आहेत.]

त्वांच शिकविलें वाढविलें त्वां । आहे मजवर भार ॥ ६ ॥

अन्वय—त्वांचि शिकविलें, त्वां वाढविलें; मजवर भार आहे.

अर्थ—आई, तूंच मला सर्व शिकविलें आणि तूंच—मला ल्हानाचें—मोठें केलेंस हे तुझे आभार मजवर फार मोठे आहेत.

स्मरण तुझ्या ह्या दृढममतेचें । होतें वारंवार ॥ ७ ॥

अन्वय—ह्या तुझ्या दृढममतेचें वारंवार स्मरण होतें.

अर्थ—वर सांगितल्याप्रमाणें—तुझ्या ह्या अतिशय ममतेची पुनः पुन्हा आठवण होते.

नित्य करावें साह्य तुला मी । हा माझा अधिकार ॥ ८ ॥

अन्वय—तुला मीं नित्य साह्य करावें, हा माझा अधिकार.

अर्थ—आई, तुला मी नेहमीं–हरएक प्रसंगीं-मदत करावी-असेंच माझें-तुझ्याशीं नातें आहे व-हेंच माझें कर्तव्य आहे.

देवाविषयीं.

अभंग.

आपुलिया बळें । नाहीं बोलवत ॥
सखा कृपावंत । वाचा त्याची ॥ १ ॥

अर्थ—आपल्या स्वतःच्या सामर्थ्यानें आपणांस बोलतां येत नाहीं-तर जो सर्वांचा-मित्र आणि कृपाळू असा ईश्वर त्याच्याच कृपेनें आम्हास ही वाणी प्राप्त झाली आहे. [त्याबद्दल उदाहरण.]

साळुंखी ते केशी । बोले मंजुळ वाणी ॥
बोलविता धणी । वेगळाचि ॥ २ ॥

अन्वय—ते साळुंखी, मंजूळ वाणी कशी बोले ? बोलविता धणी वेगळाची.

अर्थ—ती साळुंखी कशी गोडगोडशी बोलते, पण तिला बोलण्यास शिकविणारा धनी दुसराच आहे.

काय म्यां पामरें । बोलावीं उत्तरें ॥
परि त्या विश्वंभरें । बोलविलें ॥ ३ ॥

अन्वय—म्यां पामरें काय उत्तरें बोलावीं ? परि त्या विश्वंभरें बोलविलें.

अर्थ—म्यां नीचानें-दुसऱ्यानें केलेल्या प्रश्नाचे-जबाब

काय द्यावे (माझ्यानें देववणार नाहींत) पण सर्व जगाचा सांभाळ करणारा जो ईश्वर तोच माझ्याकडून बोलवितो.

तुका ह्मणे त्याची । कोण जाणे कळा ॥
वागवी पांगुळा । पायांवीण ॥ ४ ॥

अन्वय—तुका ह्मणे, त्याची कळा कोण जाणे, पांगुळा पायांवीण वागवी.

अर्थ—तुकाराम ह्मणतो, त्या ईश्वराची युक्ति कोण जाणणार आहे ?—कोणीही जाणणार नाहीं. अहो तो, ज्याला पाय नाहींत अशाल्याही पाहिजे तसा वागवितो.

सारांश—सर्वप्रकारें देवाचीच मदत आहे.

श्लोक.

मुके आंधळे पांगळे आणि थोटे ॥
अशा दुर्बळांला करा साह्य मोटें ॥
जरी त्यांस हांसाल होतील तोटे ॥
तुह्मांलाच होतां तसे जाल कोठें ॥ १ ॥

अन्वय—मुके, आंधळे, पांगळे आणि थोटे अशा दुर्बळांला मोठें साह्य करा. जरी त्यांस हांसाल [तरी] तोटे होतील. तसें तुह्माला होतां कोठें जाल ?

अर्थ—ज्यांना बोलतां येत नाहीं, दिसत नाहीं, चालतां येत नाहीं, व ज्यांना हात नाहींत अशा गरीबदुर्बल्यांस तुह्मी—मोठी मदत करा.-अशा अवयवहीनास जर हांसाल तर तुमचे मोठे तोटे होतील. आणि जर तुह्माला तसें कांहीं अवयवांत कमी झालें तर मग तुह्मी कोठें जाल ? (ह्मणजे तुह्मास मदत लागल्यास कोण करणार.)

साक्या.

प्रातःकाळीं थंड गारसा । वारा झुळझुळ येतो ॥
सर्वांला तो हुशार करितो । सुख शांतीही देतो ॥ १ ॥

अर्थ—सकाळीं थंड व गार असा वारा हळुहळु वाहतो. तो सर्वांला तरतरितपणा देऊन सुख व शांतताही देतो.

जीव वनस्पति यांस निरंतर । तो आहे आधार ॥
सुखदाता जो देव दयाळ । त्याचा हा उपकार ॥ २ ॥

अन्वय—तो, जीववनस्पति यांस निरंतर आधार आहे. हा उपकार जो सुखदाता दयाळू देव त्याचा आहे.

अर्थ—तो वारा, सर्व जीवजंतु व झाडेंझुडपें यांस नेहमीं-त्यापासून टवटवी येते-ह्मणून मोठा आश्रय आहे. हा सर्व उपकार जो सुख देणारा आणि दया करणारा देव त्याचा आहे.

मराठी दुसऱ्या पुस्तकांतील कठिण शब्दार्थ, आणि कवितान्वयार्थ.

धडा १ ला.

उपदेश—बोध.
ऐक—श्रवण कर.
बऱ्याची—हिताची.
गोष्ट—कथा.
कधीं—केव्हां.
खोटें—असत्य, मिथ्या.
लबाडी—लुच्चेगिरि.
लाभ—फायदा, हित, नफा.
देखिल—सुद्धां, हि.
पाप—पातक, वाईट कृत्य.
दंड-शासन, पारिपत्य, शिक्षा.
देव—परमेश्वर.
कळला—समजला, उमगला.
जाब—खरें खोटें विचारणें, हिशेब.
उजेडास—उघडकीस, बाहेर.
अबरू-योग्यता, मान, दानत.
खरा—प्रमाणिक.
विश्वासाचा—भरंवशाचा.
आवडतो—प्रिय होतो.
दांडगा—मस्त, मगरूम.
हाड—हड्डी.
गरिबीनें—नम्रपणानें, शांतेनें.
हुकुमांत—आज्ञेंत.
प्रीती—ममता, दया.
मर्यादा—मान, मोठेपणा.
राखणें—ठेवणें.
सारखें—प्रमाणें.
भूषण—मोठेपणा देणारे अलंकार.

धडा २ रा.

कुत्रा—श्वान.
मनुष्य—मानव.
डसला—चावला.
म्हातारी—वृद्ध बायको.
उपाय—यत्न, इलाज.
सांगितला—कळविला.
तुकडा—भाग, हिसा.
घाय—जखम.
विष—गरळ, विख.
उतरेल—कमी होईल.
शाहाणा-जाणता, सुज्ञ, ज्ञानी.
वाटेनें—मार्गानें, रस्त्यानें, पंथानें.

पुसलें—विचारिलें.
घायाळानें-जखमी मनुष्यानें
कथे—सविस्तर. [बातमी
वर्तमान—हकीकत, खबर,

धडा ३ रा.

अरब—अरबस्तानांतील मनुष्य.
निरगुट-पांघरूण—वस्त्रपात्र.
सुंदर—सुरेख, पसंत, नामी.
उमदा—तरुण, उमेदवार, जवान.
मात्र—फक्त, केवळ.
जाणून—समजून, मुद्दाम.
कबूल—मान्य.
आवडता—प्रिय.
खुषीनें—संतोषानें, आनंदानें.
मोजून—गणून.
हातीं देतों-स्वाधीन करितों, ताब्यांत देतों, हवालीं करितों.
बांधितील—बंधन करितील.
मारितील—शासन करितील.
हाल—जाच, त्रास, दुःख.
खुश—संतोषी, आनंदी.
भुई—जमीन.
फेंकून—टाकून, झोंकून.
झटकन्—त्वरित, जलद, लवकर.

धडा ४ था.

रबर—एका झाडाच्या चिकापासून तयार केलेला पदार्थ.
माहित—अवगत, ठाऊक. [स.
कितीएककाम-कांहीं असाम्यां-
मुळींच—अगदीं, बिलकुल.
उग्याच—व्यर्थ, रिकाम्या.
कल्पना—युक्ति, तर्क.
वास्तविक—खरोखर, रास्त.
चीक—डीक.
मऊ—मृदु.
मळकट—मळीण, मळलेला.
वास—गंध.
अफू—अमलीपदार्थ.
पुशिलें—घांसिलें.
चिवट—चामट, चिकट.
एकाएकीं-सहसा, अकस्मात्.
तुटत—तुकडे पडत. [केला.
ताणिला—ओढिला, लांब
उपयोग—काम, कार्य.

धडा ५ वा.

माती—मृत्तिका. [तात.
उगवतात—वर येतात, रुज-

भिजली—आर्द्र झाली, ओली झाली.
चिखल—रेबटा.
चिकणाई—चिकटपणा.
पाट—पाण्याचा लहानसा प्रवाह अडवून दुसरीकडे नेलेला असतो तो.
बांध—चिखलाचा किंवा चिखल व माती यांचा शेतांत करितात तो.
गारा—माती व पाणी कालवून करितात तो,
तोडून—कापून.
उन्हानें—उष्णतेनें.
गिलावा—चिखलाचा किंवा चुन्याचा जाड लेप.
घट्ट—कठीण, टणक.
कौलें—मातीचीं भाजून करितात तीं, नळे.
मडकीं—मातीचीं भांडीं.
वगैरे—इत्यादि.
मिसळलेलीं—मिश्रित, एके ठिकाणीं झालेलीं.
खणून—खोदून, उकरून.
मळून—तुडवून. [सांचा.
विटाळें—विटा पाडण्याचा
वाळल्या—सुकल्या.
भट्टी—पदार्थ भाजण्याकरितां केलेली जागा.
लाल—तांबड्या.
पक्क्या—भाजलेल्या. [पूर्वी.
अगोदर—आदि, पहिल्यानें,
कच्च्या—न भाजलेल्या.
रचतांना—बांधतांना.
पोटीं—मध्यें, आंत.
थर—रांग, लेप.
बळकट—मजबूत, जोरदार.

धडा ६ वा.

कांच—भिंग, वाळू आणि गारगोटी वगैरेपासून करितात ती.
गलास—कांचेचें भांडें.
हंड्या—कांचेचे टांगून लावण्याचे दिवे.
बांगड्या—बायकांचा सौभाग्यदर्शक दागिना, कंकण.
ओतींव—रस करून ओतलेलें.
गुळगुळीत—चोंटीव.
स्वच्छ—निर्मळ.
हिंदुलोक—हिंदुस्थान देशांतील मळचे रहिवासीजन.

पारा—एक पातळ व शुभ्र धातु आहे. [धातु.
कथील—वंग, एकप्रकारची
नुसती—फक्त, केवळ, मात्र.
ठुसकर—ठिसूळ, लवकर मोडणारी.
जडला—सांधला.
नीट—दुरुस्त, पहिल्याप्रमाणें.
फिरून—पुन्हा, पुनरपि.

धडा ७ वा.

चालत—क्रमित.
बिकट—कठीण, अवघड.
लंगडा—ज्यास चालतां येत नाहीं तो.
गांठ-पडली—भेट-झाली.
पार—पलीकडे.
उत्तर—जबाब.
गडी—सोबति, मित्र, चाकर.
संकटानें—दुःखानें, मेहनतीनें.
खबरदार—बळकट, मजबूद.
कामीं—उपयोगीं.
पार-पडले—निभावून गेले.

धडा ८ वा.

समजूत-समजी, समाधान, समजावणी. [मातीचें भांडें.
बरणी—कांचेचें किंवा चिनी
जंत—कृमि, प्राण्याच्या पोटांत होणारे प्राणी.
विकार—बाधा, रोग, उपद्रव.
गडबडां—उपडी उताणें लोळणें.
शेवटीं—अखेरीस, परिणामीं.
बंद होईना—थांबेना, राहीना.
पुसूं लागली—विचारूं लागली.
तात्पर्य—सारांश, हांशील.
शहाणी—समजूतदार, चतुर.
कार्य—काम.
साधीत—सिद्धीस नेत.

धडा ९ वा.

जत्रा—यात्रा, देवाच्या उत्सवाकरितां जमलेली मंडळी.
सारखी—समान, बरोबर.
ठेंच लागून—अडखळून.
फुटलें—मोडलें.
बांधून—गुंडाळून.
जमा—गोळा. [णा.
ओशाळा—खट्टू, लाजिरवा-

धडा १० वा.

रतीब—उकाडा.
हलवाई—मिटाईवाला. [दूध.
खोवा—आटवून घट्ट केलेलें

गोड—मिष्ट.

धडा ११ वा.

प्रांतांत—परगण्यांत.
स्वतंत्र—निराळें, वेगळें.
सरळ—समोर, उभीं.
कोंवळीं—कोमल.
पाला—पानें, पत्रें.
जून—निबर.
बीं—बीज.
जुड्या—पेंड्या, जुडके.
खळगा—खांच, खाडा, डबरा.
पुरून—गाडून.
वाक—आंबाडीचे दोर.
दुष्काळ—दुर्भिक्ष.
गट्ठे—बोजे, ओझीं.
शोध—तपास, थांग, चौकशी.

धडा १२ वा.

म्हातारा—वृद्ध, गतवयस्क.
आपआपसांत—एकमेकांत.
भांडत—कज्जा, तंटा करित.
धमकी—भीति, धाक, जरब.
गोडीगुलाबीनें—भांडणाशि-
वाय, समजुतीनें.
फुकट—व्यर्थ, निरर्थक.
तोड-कल्पना, मसलत, युक्ति.
जुडी—लहान मोळी.
प्रत्येकास—एकेकास, व्यक्तीस.
जोर—बल, सामर्थ्य, शक्ति.
नेट—जोर, अवसान, आधार.
आसरा—आश्रय, आधार.
मोकळी—सोडून.
अवघ्या—सर्व, एकंदर.
क्षणांत—अगदींच थोड्या वेळांत.
एकी—एकोपा, जूट.
मैत्री—स्नेह.
सुटला—नाहींसा झाला.
भलतीएकादी—कोणीही.

धडा १३ वा.

गांवढेकर—गांवढळ, खेड्यांत राहणारा.
थंडी—शीत, गारवटा, गारठा.
परसांत—घराच्या आसपासच्या जागेत.
वई—कुंपण.
व्याकुळ—व्याप्त, हैराण.
शेक—उबारा, धग, उष्णता.
हुशार—सावध.
फूत्कार—जोराचा श्वास सोडणें.
दाणादाण—पळापळ, धांदल.
आरडाओरड—हाकाहाक.

घाय–प्रहार, घाव.
दुष्टा–कृतघ्ना.
जीव–प्राण.
वांचविला–जगविला, राखिला.
उपकार–चांगलें करणें.
फेडणें–परत करणें, उलट करणें.
मरण–मृत्यु.
योग्य–बरोबर, वाजवी, टीक.
अपराध–अन्याय.
नुसत्या–केवळ, फक्त.
अधिक–ज्यास्त, फार.

धडा १४ वा.

वाटसरू–फिरस्ता, प्रवासी, पांथस्थ.
संगतीनें–सोबतीनें, मैत्रीनें.
बटवी–पिशवी.
सांपडली–मिळाली, लाभली.
उभयतां–दोघे.
सोबती–स्नेही, संगती.
भाग–हिस्सा, वांटा.
कांहींसे–थोडसे.
शिपाई–प्यादे.
गांठीत–पाटलाग करीत.
आपण–उभयतां.
सुखाचा–आनंदाचा वत्याचा.
दुःखाचा–संकटाचा.

वांटेकरी–विभागी, भागीदार, हिसेदार.

धडा १५ वा.

आकृति–आकार, चित्र.
रेघ–रेषा, रेखा.
वांकडी–वक्र.
कोन–कोण, कोपरा.
वर्तुळ–वाटोळें, गोल.
काठी–छडी.
वांक–वांकडेपणा.
थोडीशी–किंचित्, जरा.
तीर–शर, बाण.
कमठा–तीर मारण्याचें साधन, कांबीट.
रुमाल–फडका.
शिंपी–शिवणारा, दरजी.
कडें–कटक, वलय.

धडा १६ वा.

वेडे–मूर्ख, अविचारी.
मागें–पूर्वी.
ताजें–हिरवें, नुकतेंच तोडलें, कोंवळें.
दुखणाईत–आजारी.
निगा–व्यवस्था.
राखी–ठेवी.
डोंगर–जमिनीवरील उंचवटे.
थकलीं–श्रमलीं, भागलीं, दमलीं.

बगलेंत—कांखेंत.
कुरण—राखलेलें गवत.
रंजविणें—रमविणें, तोषविणें खूष करणें.
पांवा—पावरी, मुरली, वेणु
गाणें—गायन, गीत. [भाळ
लालनपालन—संरक्षण, मां
मेंढवाडा—मेंढरें ठेवण्याची जागा.
कोंडून—अडकावून.
सपाट—मैदान.
अंधार—काळोख.
बंदूकरी—लावून टाकी.
उजाडलें—सूर्योदय झाला.
उघडी—मोकळें करी.

धडा १७ वा.

रोजरोज—नेहमीं, दरदिवशीं.
रात्र—निशा, रजनी.
कारण—मतलब, सबब, हेतु.
जुलुम-जबरदस्ती, बळजोरी.
खचित—खरोखर, निःसंशय.
सवड—संधि, वेळ.
बेत—ठराव.
पळून जावें—चोरून निघावें.
मनास येईल—मर्जीस वाटेल.
फिरावें—हिंडावें.
बरें वाटतें—चांगलें आवडतें.
लहान्या—अज्ञाना, तान्ह्या.
पाळणारा—रक्षण करणारा, राखणारा.
ऐकिलें—आज्ञा मानिली.
एकटे—एकाकी, दुसऱ्याशिवाय.
घात—नाश.
बरोबर—समागमें, सोबतीनें.
लपून—छपून, दडून. [चीं.
वरकड—इतर, दुसरीं, बाकी-
नाचत—आनंदानें उड्या मारीत.
शिरलें—निघालें, गेलें,
भयंकर भीति देणारे, क्रूर.
अकस्मात्—एकाएकीं.
दरी—गुहा, पर्वत किंवा डोंगर यांतील पोकळ जागा.
गाळण आली—धैर्य गेलें; खचलें.
स्वच्छंदपणा—स्वतंत्रता.
पस्ताव—पश्चात्ताप, मागून दुःख होणें.
चिंतेंत—दुःखांत, काळजींत.
तोंच—इतक्यांत, लगेच.
पिलांस—पोरांस.

भल्या—चांगल्या.
मानिलें—ऐकिलें. [वडील.
वाडवडील—पूर्वज, आपलीं
प्राप्त होईल—लाभेल, मिळेल.

धडा १८ वा.

रूप—स्वरूप, चेहेरा.
साधारण—मध्यम.
हिणवणें—उणेपणा काढणें, लाजिरवाणें. [कुरकुर.
गाऱ्हाणें—रडगाणें, कागाळी,
समाधान—सुख, शांति.
दुर्गुण—अवगुण, वाईटवागणूक.
मळ—कलंक, डाग.
उणें—न्यून, कमी.
गुण—वर्तणूक, वर्तन.
पुरतें—पूर्ण.

धडा १९ वा.

शेतकरी—शेतीचा उद्योग करणारा.
पाव-चतुर्थांश, चवथा हिस्सा.
माघारा—परत.
पालथा—उपडा.
भरली—बरबटली.
मनांत भरून आलें—खात्री आली, खचीत वाटलें.
राग—संताप, क्रोध.
धक्का—इजा, दुःख.
राखिलें—रक्षिलें, वांचविलें.
हायहाय—अरेरे! दुःखार्थी शब्द.
दुष्टानें—क्रूरानें. [स्फुरण.
आवेश—रागाचा वेग, झपाटा,
शांति—स्वस्थता, स्थिरता, थंडपणा.
निरपराधी—निरन्यायी.
भलतेंच—अयोग्य.

धडा २० वा.

झटत—यत्नकरीत.
गमत—रमत, वेळ घालवीत.
पैका—पैसा, द्रव्य.
खर्च—व्यय.
अडचण—पंचाईत.
हिशेब—गणित, मेळ.
व्यापार—देवघेव.
कदाचित्—एकादेवेळीं.
चाकरी—नोकरी.
काम पडेल—कारण लागेल.
गुंतत—अडकून राहत. [रूर.
लागलाच—लगेच, तसाच, ज-
चोरी—नकळत दुसऱ्याची वस्तु नेणें.

चाळे—खोड्या.
संगत—सोबत, मैत्री.
खमंग—स्वादिष्ठ.
आशा—इच्छा.
खाणेंपिणें—अन्नपाणी.
वस्त्रपात्र-कापड, भांडीं वगैरे.

धडा २१ वा.

उन्हाच्या—तापाच्या, उष्णाच्या.
ओढा—ओहोळ.
प्यावयास—पिण्यास.
निमित्त—कारण, सबब.
कळ—खोडी, कज्जा.
गढूळ—खराब, वाईट.
भागवूं—कमी करूं, शमवूं.
मुकशील—अंतरशील.
बिचारें—गरीब, दीन.
घाबरलें—भ्यालें. [पडून
नमून—नम्र होऊन, पायां
उलटें—उलट, उफराटें.
कल्पून—योजून.
लुच्चे—लबाड.
जन्मून—उपजून.
अझून—अद्याप. [झालें.
अडला—नडला, सुचेनासें
वटारून—रागानें डोळे मोठे करून.
रांडलेंका—अपशब्द, शिवी.
एकूण—मिळून.

धडा २२ वा.

आवडतें—प्रिय वाटतें.
आवड—प्रीति, प्रिय.
मान्य—कबूल.
ठीक—बरोबर.
पण—परंतु. [योग्य.
जोगी—तशी,लायक,सारखी,
ध्यानांत—मनांत. [तेंचतेंच.
खोदूनखोदून—पुन्हापुन्हा,
परमेश्वर—देव.
उत्पन्न—निर्माण.
पक्की—मजबूत, चांगली.

धडा २३ वा.

बळेंच—जोरानें, जबरीनें, जुलूमानें. [रून.
झोंबून—बिलगून, मस्ती क-
दीडदमडीची—अगदीं थोड्या किंमतीची.
बाजा—एक वाद्य.
ओंवाळून टाकणें—धिक्कार करणें, कमी मानणें.
वाहवा—शाबास, धन्य.

माडी-माळा, मजला.
हिडुम-मलीन, ओंगळ, घा-
लगीन-लग्न, विवाह.

धडा २४ वा.

कबूल केलें-वचन दिलें.
पोशाग-जामानिजामा, पेहे-
गाव.
मावेना-माटवेना, राहीना.
भ्रम-घाईनें, वारंवार.
खेपा-येरझाग. [तीची हुंडी.
कुंडी-रोप लावण्याची मा-
ळला-जगेचें वस्त्र. [फांदी.
डांगळी-डाहाळी, शाखा.
तुटून-मोडून, सुटून. [धानें.
रागें भरून-रागावून, क्रो-
कांपनकांपत-थरथरत, कंप-
युक्त.
थंड-शांत.
खालीं मान घालणें-लाजणें.
मुकाट्यानें-न बोलतां.
आंसवें-अश्रु, डोळ्यांतील
पाणी. [करणारा.
नीतिवंत-न्यायी, विचारानें
परस्पर-एकमेक. [टणें.
गहिंवर-कंठ भरून येणें, दा-
आवडतीं-प्रीतीचीं, प्रिय.
आटोपून-सांवरून.
नासलें-बिघडलें.
शहाणपण-अक्कल, बुद्धि.

धडा २५ वा.

गार-थंड, गारगोटी.
पावसाळा-पर्जन्यकाळ.
हिंवाळा-थंडीचे दिवस.
झोंबतो-लागतो.
धूळ-धुरोळा.
धुंद-धरून, तुंद.
सटासट-झटपट, भराभर,
लवकर. [चे तुकडे.
गारा-घट्ट झालेल्या पाण्या-
थर-रांगा, ढीग.
टवटवी-तेजी.
पूर-पाण्याचा लोट.
उगवणें-वर येणें, रुजणें.
महागाई-महर्गता, वस्तूची
कमताई.
शाकारणें-पाणी न यावें म्ह-
णून घरावर कौलें गवत
वगैरे घालणें.
सर्पण-जळण, लांकडें.
बेगमी-सांठा, संग्रह, पाहिजे
तितकें असणें.

धडा २६ वा.

उत्तम–श्रेष्ठ, योग्य उत्कृष्ट.
चकाकी–चमक, लकाकी.
दागिने–अलंकार.
श्रीमंत–धनवान, मातबर.
पत्रा–कागदाप्रमाणें केलेली धातु.
तार–धातूचा दोर.
मुलामा–जिलई, गिलावा.
नाद–आवाज, ध्वनि.
ग्लाण–ग्लानि.
चौफुला–कान, इलाची वगैरे पानसुपारीचा मसाला ठेवण्याचीं भांडीं.
अत्तरदाणी–अत्तराचें भांडें.
तांब्रस–थोडा तांबडा.
चिवट–लवचीक.

धडा २७ वा.

पिसारा–पिसें.
पोपट–शुक, राघु, कीर.
ढोली–झाडास आपोआप असलेली पोकळी.
घरटीं–पक्ष्याचीं घरें, कोटीं.
आंडीं–कवटें.
पिंजरा–पंजर, बाळगलेल्या पशुपक्ष्यांचें घर.
अर्थ–तात्पर्य, भावार्थ, मतलब.
चोंच–चंचू, पक्ष्याचें तोंड.
बांकदार–कमानदार, वळलेली.
कवटी–कवची, टणक साल.
पोपटविद्या–घोकीव ज्ञान.

धडा २८ वा.

धीटपणा–धीरपणा, धिटाई.
देखणेपणा–दिसणेपणा.
कळप–झुबका.
झुजणें–लढणें, सामना करणें.
हौस–प्रीति, आवड.
उभारलेलीं–उभीं केलेलीं.
शेंडे–शेवटें, अग्रे, टोंकें.
साद–आवाज, शब्द, हांक.
मागुती–मागें.
आंकणें–आच्छादणें.
दरखेपेस–प्रत्येक वेळेस.
नर–पुरुष.
मादी–स्त्री.

धडा २९ वा.

उगवणें–उदयास येणें.
मावळणें–अस्तास जाणें, नाहींसें होणें.
पूर्व–सूर्य उगवण्याची बाजू.

पश्चिम—सूर्य मावळण्याची बाजू.
उजवा—दक्षिण.
डावा—वाम.
सोपें—सुलभ.
भूगोल—पृथ्वीचा वर्तुल.
उजाडणें—सूर्योदय होणें.

धडा ३० वा.

तंबू-प्रवासगृह, कापडाचें घर.
खांब—स्तंभ, आधारभूत.
डेरा—मोठा तंबू.
टप—तंबूचा वरचा भाग.
कनात—तंबूच्या भोंवतालचा भाग.
दुहेरी—एकावर एक.
बाधा—इजा, त्रास, दुःख.
स्वारीस—फिरण्यास.
शिकारीस—पारधीस.
कामदार—अमलदार. [म.
अवश्य—अगत्य, जरूर, मुद्दा-
कष्टानें—श्रमानें, मेहनतीनें.
किनखाप—एकप्रकारचें रेशमी व जरीचें वस्त्र.
राहुटी—लहान तंबू.
पाल—अतिशय लहान तंबू.
चाकर—सेवक, अनुग, नोकर.
उद्योगशाळा—धंदे शिकविण्याची जागा.

धडा ३१ वा.

लोखंड—लोह.
कथील—वंग, एक धातु.
चिकटत—डसत.
कठीण—टणक.
स्वस्त—सवंग, सुगी.
कृति—करणें, प्रयोग.
पोलाद—तिखें.
शस्त्र—आयुध, हत्यार. [वणें.
वितळणें—पातळ होणें, द्र-

धडा ३२ वा.

वेंचणें—निवडणें, टिपणें.
सुमारें—अदमासें.
कबरा—करडा रंग. [स्वार्थी.
कावेबाज—मतलबी, लुच्चा,
कंटाळा—त्रास, नकोसें होणें.
अधाशी—हावरी. [अखंड.
सर्वदा—निरंतर, चिरकाल,
वापरत—खपत, झडत.
वेतें—प्रसवण्याच्या खेपा.
वृद्धि—वाढ.
शत्रु—अरि, वैरी, दावेदार.
आळीपाळीनें—नियमित क्रमानें.

धडा ३३ वा.

दांडा—मोटा.
फाळ—नांगराचें लोखंडी पातें.
जुंपलें—जोडलें, लाविलें.
जूं—जोखड.
असूड—चाबूक, कशा.
कोळपें—खुरपें.
कापणी—शेताची लाण.
मळून—चोळून.
वाफ—अळी.
हंगाम—वेळ, सुगी.

धडा ३४ वा.

चांचपून—सांमपून.
बळम—चिकट पदार्थ.
निमरून—थमरून.

धडा ३५ वा.

प्रकृति—तबियत. [ल्ली.
बिघडलेली—नादुरुस्त, नाम-
चिळस—किळस, त्रास. कं-
टाळा.
घाण—दुर्गंधि.
निरोगी—दोषरहित.
दुखणेंबाणें—आजार, पीडा.
खुशाल—क्षेम, सुखरूप.
घामट—मलीन, घर्मयुक्त.
रोगी—रोगानें पीडित.
आरोग्य—निरोगी.
शोभा—सुरेखपणा, सौंदर्य.

धडा ३६ वा.

खार—चानी, खडी.
चपळ—चंचल, चलाख, तलख.
बुंध—बूड, मूळ.
दुबेळकें—गेचक.
मोकळें—उघडें.
तिरपी—किंचित् वांकडी.
ताटी—कवाड, कुडाचें दार.
सांठवून—जमवून. [दांत.
सुळे—बारीक टोंकाचे मोठे
अणीदार—तीक्ष्ण, टोंकदार.
पिंजारलेली—पसरलेली.
भुरे—पिंगट.

धडा ३७ वा.

ससा—शशक.
गोजिरवाणें—सुंदर, मोहक.
जंगली—रानटी.
भुसभुसीत—ढिसूळ.
श्वापदें—पशु, जनावरें.
भित्रा—भ्याड.
उदी—एकप्रकारचा रंग.
बाळगणें—पाळणें, राखणें.
सवयीचा—संगतीचा.
आर्जव—प्रार्थना, विनवणी.

धडा ३८ वा.

तापणें–ऊन होणें.
उपसून–काढून.
कढन–फार उष्ण.
मिश्रण–ऊन पाणी बेताचें होण्याकरितां त्यांत थंड पाणी घालतात तें.
खोल–खोल.
सैंपाक–स्वयंपाक, सूप, अन्न तयार करणें.
तुकता–आतांच.
अवघड–कठीण.
वैल–चुलीला एक बाजूस दुसरा पदार्थ शिजण्याकरितां केलेलें भोंक.
न्हावी–हजाम, नापिक.
खुंट–नाकें, देवडी, पुष्कळ असामी बसण्याची रस्त्याच्या बाजूची जागा.

धडा ३९ वा.

मजपेक्षां–माझ्याहून.
घोडा–अश्व.
ताजा–नवा, हुषार, तरणा.
लठ्ठ–माजलेला.
शक्ति–सामर्थ्य.
द्वाड–दांडगा.
पांढरा–शुभ्र, सफेत.
हरवला–सांडला, गमावला.
मांडिली–ठेविली.
संकोच–शंका, भीड.
सभा–विद्वानलोकांचा बसलेला समुदाय.
उशीर–वेळ.
भारी–अधिक, जास्त.

धडा ४० वा.

पुरता–पुरा.
बुक–पुस्तक.
खोळंबा–खोटी.
धनी–यजमान.
भल्या–चांगल्या, सभ्य.
गोंगाट–गलबला, गडबड.

धडा ४१ वा.

इटीदांडू–एकप्रकारचा खेळ.
वाळवंट–रेतीची जागा.
मैदान–सपाट जमीन.
विचारून–पुसून.
बजावून–विशेष जोरानें सांगून.
खबरदार–संभाळून रहा.
हालूं–नको–जाऊं नको.
रंगांत–भरांत
मौज–गम्मत, चैन.
सर्वांच–यापूर्वींच.

मर्जी—इच्छा, हे
थांब—धीर धर. [लगी.
मावसबहीण—मावशीची मु-
समाचार—विचारपुस, हकी-
कत.
गुंतून अडकून.
करार—कबूल.
खटपट—मेहनत, श्रम.
गरज—जरूर. [ला.
टाळला—चालविला, दूर के-
गडी—मित्र, स्नेही, सोबती.

धडा ४२ वा.

गोष्ट—कथा.
अगत्याची—काळजीची.
लक्ष—मन, चित्त, ध्यान.
सवय—खोड, चट.
घाई—जल्दी, त्वरा.
कदाचित्—केव्हांकव्हां.
समजत—उमजत, कळत.
पुरता—पूर्ण, सगळा.
पुन्हापुन्हां—वारंवार. [वर.
सुरावर—हेल काढून गळ्या-
जोर—नेट, अवसान.
स्पष्ट—पूर्ण.
सावकाश—वेळ घेऊन.

धडा ४३ वा.

विंचू—एक विषारी प्राणी
पाय—पाद, चरण.
नांगी—विषारी कांटा.
भेगेंत—चिरांत.
उजेड—प्रकाश.
उन्ह—ताप.
लपून—छपून, दडून.
पाठ—पृष्ठभाग.
वळवून—घेऊन.
मुरडून—वांकडी करून.
भिनून—जिरून, मुरून.
चोखावी—ओढावी.
वेदना—दुःख, इजा.
कातडी—त्वचा, चामडी.
शाबूत—मजबूत.
डांसाची—चावाची.
जखम—चावा.

धडा ४४ वा.

माता—आई, जननी.
पिता—बाप, जनक.
धनी—यजमान.
गुरु—शिक्षक.
आज्ञा—हुकूम.
सदैव—नेहमीं, नित्य.
मानावी—ऐकावी.

धन—द्रव्य.
अखंड—नाश न होणारी.
कोमल—कोवळें.
जून—निबर, जरंडा.
शार्मील—खाईल.
दुष्कर्म—वाईट काम.
लोकीं—जनांत.
परिणाम—शेवट.
नीट—चांगलें.
सत्य—खरें.
खोटें—असत्य.
सर्वदा—नेहमीं, सदोदित.
टाकावें—सोडावें.
द्वेष—राग.
अहर्निश—रात्रंदिवस.
दावा—द्वेष.
कीर्ति—यश.

धडा ४५ वा.

कज्जेकफावती-भांडण, तंटा.
नांदती—एके ठिकाणीं वर्तन करिती.
कळी—तंटा, कळ.
गुण्यागोविंदांनीं—आनंदानें. गोडीगुलाबीनें.
शहाणी—सुज्ञ.
उखाळ्यापाखाळ्या— एकमेकांचीं वर्मे.
वर्दळीस—हातघाईस.
खाणें—चावणें.
माफ—क्षमा.
लहरी—लाटा.
मूळ बीज.
धरूनी—नाहींसें करून.
प्रौढ—वयांत.
संतुष्ट—आनंदीत.

धडा ४६ वा.

मिथ्या—खोटें, लटकें.
निर्मितो—उत्पन्न करितो.
लया—नाशा.
सारे सर्व.
सान—लहान.
थोर—मोठे.
खरा—सत्य.
सोयरा—आप्त.
मायाळू—कृपाळू.
अन्य—दुसरा.
सर्वसाक्षी—सर्व पाहणारा.
लक्षी—पाही.
तिळमात्र—थोडीसुद्धां.
गणावें—मोजावें.
उपाय—इलाज, यत्न.
निशा—रात्र.

निस्तेज–फिका.
प्रकाश–उजेड.
लोपल्या-दिसेनाशा झाल्या.
ठाव जागा.
वृक्ष–झाड, तरु.
प्रभातीं–प्रातःकाळीं.
मुंजुळ–मधुर, गोड.

कविता.

आर्या.

माता पिता धनी गुरु ह्यांचा आज्ञा सदैव मानावी ।
पितरें जन्म, धनी धन देती विद्या अखंड गुरु दावी ॥ १ ॥

अन्वय—माता, पिता, धनी, गुरु ह्यांची आज्ञा सदैव मानावी, पितरें जन्म, धनी धन देती. गुरु अखंड विद्या दावी.

अर्थ—आई, बाप, यजमान विद्या शिकविणारा गुरु, यांचा हुकूम नेहमीं मानावा—ह्म० हे सांगतील तसें वागावें. आईबाप जन्म देतात धनी—श्रीमंत द्रव्य देतात; आणि गुरु कधींहि नाहींसें न होणारें ज्ञान शिकवितो.

जोंवरि आहे तुमचें मन कोमल तोंवरी करा विद्या ।
जर मनीं न शिरे ती, ग्रासिल तुह्मांस की मग अविद्या ॥ २ ॥

अन्वय—जोंवरी तुमचें मन कोमल आहे तोंवरी विद्या करा, ती जर मनीं न शिरे, मग तुह्मास अविद्या ग्रासील.

अर्थ—जोंपर्यंत तुमचें मन—नवीन डाहाळीप्रमाणें—कोमल आहे तोंपर्यंत तें पाहिजे त्या विद्येकडे वळवून तुह्मी ज्ञान संपादन करा. मुलांनो तें पुष्कळ अभ्यास करून येणारें ज्ञान मोटेपणीं तुमच्या मनांत शिरणार नाहीं बरें मग तुह्मास अविद्या ह्म० अज्ञान ग्रासून टाकील ह्म० तुह्मी मूर्ख व्हाल.

दुष्कर्मांचा लोकीं घडतो परिणाम फार वाईट ।
ह्याकरितां त्यापासुनि दूर रहावेंचि हे दिसे नीट ॥ ३ ॥

अन्वय—लोकीं, दुष्कर्मांचा परिणाम फार वाईट घडतो. ह्याकरितां त्यापासुनि दूर रहावेंचि हें नीट दिसे.

अर्थ—लोकांत, वाईट कृत्याचा शेवट अतिशय दुःखदायक होतो. ह्मणून त्या—वाईट कृत्या-पासून दूर रहावेंच (ह्म० तें करूं नयेच) हें चांगलें.

अभंग.

सत्य सर्वदा बोलावें । खोटें सर्वदा टाकावें ॥ १ ॥
सत्य ईश्वरा आवडे । सत्यें सर्व सिद्धि घडे ॥ २ ॥

अन्वय—सर्वदा सत्य बोलावें, सर्वदा खोटें टाकावें. ईश्वरा सत्य आवडे, सत्यें सर्व सिद्धि घडे.

अर्थ—निरंतर खरें भाषण करावें कधींही खोटें बोलूं नये; कारण देवाला खरें प्रिय आहे व खरेपणानें सर्व-कामें—तडीस जातात.

असत्याचा करा द्वेष । सत्य जोडा अहर्निश ॥ ३ ॥
भांडूं नये बाळकांनीं । दावा धरूं नये मनीं ॥ ४ ॥

अन्वय—असत्याचा द्वेष करा, अहर्निश सत्य जोडा. बाळकांनीं भांडूं नये मनीं दावा धरूं नये.

अर्थ—खोटेपणा अगदीं सोडून द्या आणि रात्रंदिवस खरेपणा धरा. मुलांनीं [कधीं कोणाबरोबरहि] तंटा करूं नये व [कोणाशीहि] मनांत राग धरूं नये.

उणें कोणा बोलूं नये । शिव्या कोणा देऊं नये ॥ ५ ॥
भलेपणें जे वागती । त्यांची लोक कीर्ति गाती ॥ ६ ॥

अन्वय—कोणा उणें बोलूं नये, कोणा शिव्या देऊं नये. जे भलेपणें वागती. त्यांची लोक कीर्ति गाती.

अर्थ—कोणाल्याहि, त्याचा कमीपणा काढून बोलूं नये कोणाला गाळी देऊं नये. जे—मनुष्य—चांगल्या रीतीनें वागतात त्यांची स्तुति करितात.

बहीणभावांची प्रीति.

अभंग.

कज्जे कफावती होऊत रस्त्यांत । असावी घरांत शांति मोटी ॥ १ ॥
बहीणभावंडें नांदती ज्या स्थळीं । नमावा बा कळी तेथें कधीं ॥ २ ॥

अन्वय—रस्त्यांत कज्जे कफावती होऊत, घरांत मोटी शांति असावी. ज्या स्थळीं बहीणभावंडें नांदती. तेथें कधीं कळी नमावा.

अर्थ—मार्गांत तंटे बखेडे होवोत. पण घरीं–मुलांमध्यें–मोठी शांतता असावी, कारण ज्या ठिकाणीं बहीणभाऊ रहतात, तेथें कधींही तंटा असूं नये. कारण त्यापासून शेवटीं फार दुःख होतें.

पक्षीही ल्हान घरटीं बांधनि । गुण्यागोविंदानीं राहातातीं ॥ ३ ॥
मग जीं शहाणीं बालकें आहेत । त्यांमध्यें व्हावेत कज्जे काय ॥ ४ ॥

अन्वय—पक्षीही ल्हान घरटीं बांधूनि गुण्यागोविंदानीं राहातातीं. मग जीं शहाणीं बालकें आहेत, त्यांमध्यें कज्जे व्हावेत काय ?

अर्थ—अज्ञान अशीं पांखरेंही, ल्हान ल्हान घरटें करून गोडीगुलाबीनें राहातात. मग जीं शहाणीं मुलें आहेत त्यांमध्यें भांडणें व्हावीत काय ?—होऊं नयेत.

उखाळ्या पाखाळ्या काढोनि भांडावें । वर्दळीस यावें काय त्यांनीं ॥ ५ ॥
एकामेकांवरी दांत ओंठ खाणें । नाही लाजिरवाणें त्यांस काय ॥ ६ ॥

अन्वय—त्यांनीं, उखाळ्या पाखाळ्या काढोनी भांडावें. वर्दळीस यावें काय. एकामेकांवरी दांत ओंठ खाणें, त्यांस लाजिरवाणें नाहीं काय ?

अर्थ—त्या–मुलां–नीं, एकमेकांचीं उणीं काढून तंटा

करावा व हानघाईस यावें-हें त्यांस योग्य आहे-काय ? एकमेकांवर रागानें दांत ओंठ चावणें हें त्यांस शरम आ-णणारें-काम-नाहीं-काय

देवराया [illegible] लेंकुरबुद्धी वा । झणाट्या रागाचा माफ करा ॥ ७ ॥
आणखी आमच्या रागाच्या लहरी । काढाव्या बाहेरी मनांतूनी ॥८ ॥

अन्वय—देवराया आतां लेंकुरबुद्धीचा, रागाचा झपाटा माफ करा. आणखी आमच्या मनांतूनी रागाच्या लहरी बाहेर काढाव्या.

अर्थ—हे परमेश्वरा, आतां बालकाच्या अज्ञानपणांत झालेल्या अपराधामुळें आपणास रागाचा मोठा आवेश आला असेल; तर त्याची क्षमा करा, व आमच्या मनांत वारंवार येणारा राग-अगदीं-काढून टाका.

इतर जे मळ संतापाचें मूळ । धुऊनि सकळ टाका तेही ॥ ९ ॥
जैसे जैसे आह्मी प्रौढवया येऊं । भरूनियां जाऊं प्रेमानंदें ॥ १० ॥
हीच आहे तुज मागायाची गोष्ट । होऊनि संतुष्ट द्यावी आज्ञा ॥११ ॥

अन्वय—जे, इतर मळ संतापाचें मूळ तेही सकळ धुऊनि टाका. आह्मी जैसे जैसे प्रौढवया येऊं तसे प्रेमानंदें भरूनियां जाऊं. हीच गोष्ट तूज मागायाची आहे. संतुष्ट होऊन आज्ञा द्यावी.

अर्थ—जे दुसरे-दोष आहेत: ते राग येण्यास कारण आहेत. ह्मणून ते सर्वहि नाहींसे करून टाक. आह्मी जसे जसे मोठे होऊं तसे तसे-ज्ञान प्राप्त झाल्यामुळें तुझ्याविषयींच्या-प्रीतीपासून होणाऱ्या आनंदांत गढून जाऊं. [क्षमा कर] हेंच काय तें तुझ्याजवळ मागणें, तें तूं संतोषानें दे ह्म० तसें कर.

[illegible] बोलत अनेक [illegible]
[illegible] सोनियां कथा [illegible] ॥ २ ॥

[illegible] एक आहे [illegible] बोलतो
[illegible] सर्वांनींही [illegible]
[illegible] मध्ये [illegible]
[illegible] मोठें आहे.

[illegible]

अन्वय——चंद्र, सूर्य, [illegible] आहे त्याशी लि-
[illegible] नीच अन्नपाणी [illegible] सं[illegible]
[illegible]

[illegible] त्या [illegible]
[illegible] लहान [illegible]
[illegible] सर्व प्राण्यांना स्वरोखर
इत्यादि आहे.

दिंडी.

[illegible] कोण आहे ।
[illegible] ॥
[illegible] ।
[illegible] सर्व [illegible] ॥ १ ॥

[illegible] निज कृपादृष्टि [illegible] आम्हा [illegible]
[illegible] सर्व शक्ति सर्वज्ञ, सर्व साक्षी [illegible]
[illegible]